# ओबीसी आरक्षणात (उपगट) विभाजन का पाहिजे?

## मा.हरिभाऊ राठोड यांनी खास मुलाखत

**पत्रकार:- केंद्रीय ओबीसी आरक्षणाचे विभाजन करण्याची जी आपली मागणी आहे त्याची सद्यस्थिती काय?**

**मा.हरिभाऊ राठोड:-** नुकतेच दि 23 ऑगस्ट 2017 रोजी केंद्र सरकारनी मंत्रिमंडळात ओबीसी विभाजन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पुढील तीन महिन्या करिता हा आयोग काम करून ओबीसी विभाजना बाबत भारत सरकारला एक अहवाल सादर करेल.

**पत्रकार:- राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगानी तर या पूर्वीच ओबीसी चे Sub-Categorization करा असे निर्देश दिले असतांना हा आयोग नेमण्याचे कारण काय?**

**मा.हरिभाऊ राठोड:-** हो हे खरे आहे, परंतु आता असा निर्णय घेण्यात आला आहे की,केंद्र सरकारच्या सूची मधील ओबीसी समाजाची/जातीची आरक्षणाची सद्यस्थिती व त्याचे ओबीसी समाजाला मिळत असलेले लाभ याची माहिती हे आयोग सरकारला देईल.

**पत्रकार:- केंद्रीय ओबीसी आरक्षणाचे विभाजनामुळे कोणाला लाभ मिळेल ?**

**मा.हरिभाऊ राठोड:-** एक गोष्ट मी या ठिकाणी स्पष्ट करू इच्छितो,हे आरक्षणाचे विभाजन केंद्र सरकारच्या ओबीसी यादीतील समाविष्ट असलेल्या समाजाचीच/ जातीचीच होणार आहे राज्यात याचा कुठलेही संबंध नाही. जे आरक्षण राज्य सरकारने देऊ केलेले आहे ते मिळत राहील(उदा महाराष्ट्रात बंजारा समाजाला 3% वेगळे आरक्षण)

आता तुम्ही जो प्रश्न केला आहे, लाभ कोणाला मिळेल. बघा आपल्या केंद्रीय ओबीसी सूचित जवळपास --- हजार जाती आहे ,या मधील ज्या मजबूत जाती आहेत,ते दबलेल्या अशा जातींना आरक्षणाचा काहीच लाभ मिळू देत नाही,त्या मुळे आमची जी मागणी आहे, विभाजनाची जर असे झाले तर 27% तीन भाग 9%-9%-9% असे विभाजन केल्यास यामध्ये स्पर्धा होणार नाही परिणामी दबलेल्या जाती आहे त्यांना त्याचा लाभ मिळेल.

**पत्रकार:- काही राज्यांनीतर यापूर्वीच ओबीसी उपवर्गीकरण केले आहे, त्याचा लाभ राज्यातील ओबीसी समाजाला होत आहे काय ?**

**मा.हरिभाऊ राठोड:-** होय लाभ होत आहे, देशातील नऊ राज्यांनी असे वर्गीकरण(विभाजन) केले आहे, आंध्र प्रदेश,तेलंगणा,पंदुचेरी,हरियाना,झारखंड,पश्चिम बंगाल, बिहार,महाराष्ट्र, आणि तामिळनाडू राज्यात यापूर्वीच विभाजन करण्यात आलेले आहे, महाराष्ट्रत ओबीसी मधून VJNT यांना वेगळे 11% व SBC यांना 2% वेगळे आरक्षण देऊन,या दबलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यात आले आहे. तसेच ज्या राज्यांनी वरील प्रमाणे विभाजन केले आहे , त्यांना या केंद्रीय ओबीसी आरक्षणाचा काहीच नुकसान होणार नाही. त्यांना जे राज्य सरकार आरक्षण देत आहे तेच चालू राहील यात मुळीच बदल होणार नाही.

**पत्रकार:- केंद्रीय ओबीसी आरक्षणाचा फायदा कसा ,व केव्हा मिळेल?**

**मा.हरिभाऊ राठोड:-** ओबीसींना मंडल आयोगाच्या शिफारशी प्रमाणे 27 % आरक्षण, केंद्राच्या ओबीसी यादी मध्ये भटक्या विमुक्त व बारा बलुतेदार आणि अत्यंत मागासजातींचा समावेश आहे , पण असे निदर्शनास आले आहे की,मंडल आयोग लागू झाल्या पासून या भटक्या विमुक्त आणि बारा बलुतेदार या सारख्या जातींना त्याचा लाभ मिळत नाही उदा. आय.ए. एस. आय.पी.एस. आय.आर.एस. पोष्ट ऑफिस,रेल्वे,राष्ट्रीयकृत बँका, केंद्र सरकारचे कार्यालय, महामंडळे, इत्यादी आणि म्हणून महाराष्ट्रात जसे, विभाजन झाले आहे तसेच विभाजन केंद्रात आवश्यक झाले आहे. त्याचा फायदा, भटक्या विमुक्त, न्हावी, खाती, वाडी, लोहार, सोनार, सुतार, कुंभार, धोबी, रामोशी, गुरव, तांबोळी, वाणी, कासार, भाट, जिनगर, सीनगार, बरड, शिंपी, गोसावी, डवरी-गोसावी, कोष्टी, विणकर, बेलदार, कुमावत, भोई, केवठ, आणि तेली माळी, कोळी, धनगर,या अतिमागसांना होणार आहे.

तसेच आपण विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नांचे उत्तर-असे की 23 ऑगस्ट 2017 पासून बारा आठवडे, म्हणजेच तीन महिन्यात याचा निर्णय दिसेल.

**पत्रकार:- आपल्या या विभाजना मुळे राज्यातील धनगर, मराठा व मुस्लिम समाजाचा आरक्षणाचा प्रश्न सुटेल काय ?**

**मा.हरिभाऊ राठोड:-** होय, नक्कीच आमची तर यापूर्वी पासुनच मागणी आहे.लोकसंख्येच्या प्रमाणात सगळ्यांना आरक्षण द्या . तसेच केंद्रातील विभाजना मुळे धनगर,मराठा ,मुस्लिम या समाजाचा जो जटील प्रश्न आहे, तो नक्कीच सुटेल.

**पत्रकार:- सरकारनी यापूर्वी अनेक आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या नाही, या बाबतीत आपले मत काय ?**

**मा.हरिभाऊ राठोड:-** होय हे खरे आहे, भीती फक्त अशीच आहे की , डॉ.मनमोहन सिंगजी पंतप्रधान असतांना डॉ.गणेशदेवी यांच्या नेतृत्वाखाली Technical Advasary Group (TAG) नेमली होती, त्या कमिटीचा रिपोर्ट अत्यंत चांगला आणि दुर्गम परिणाम करणारा आणि सामाजिक न्याय देणारा होता. परंतु तो अहवाल रेणके आयोगांनी दडपून टाकला,आणि समाजाला सामाजिक न्याया पासून वंचित ठेवण्यात आले होते, आता तसे होऊ नये या साठी या समाजातील लोकांनी जागृत राहणे गरजेचे आहे.

**पत्रकार:- विभाजन झाल्यास किती लोकांना याचा फायदा मिळेल ?**

**मा.हरिभाऊ राठोड:-** भटक्या विमुक्तांच्या देशभरातील 666 जाती आणि (जवळपास 22 करोड) बारा बलुतेदार आणि इतर अत्यंत मागास जाती 540 (जवळपास 18 करोड) या एकूण जवळपास 1206 जाती (म्हणजेच 40 करोड) जातींना याचा लाभ मिळेल.

**पत्रकार:- आपल्या या मागणी करिता आगामी लढा उभारणार काय ?**

**मा.हरिभाऊ राठोड :-** निश्चितच लढा उभारणार कारण या आधीचा अनुभव आम्हास आहे, सरकारवर जो पर्यंत दबाव आणणार नाही, तो पर्यंत या दबलेल्या व वंचित समाजाच्या प्रश्नाची जाणीव सरकारला होणार नाही.आणि म्हणूनच येत्या 30 नोव्हेंबर 2017 रोजी रामलीला मैदान दिल्ली येथे आंदोलन करून या प्रश्ना संदर्भात सरकारचे लक्ष वेधून घेणार आहोत.

**पत्रकार:- या केंद्रिय ओबीसी आरक्षणाला विरोध होणार नाही काय ?**

**मा.हरिभाऊ राठोड:-** मुळीच नाही कारण हा कोणत्या एक जाती पुरता निर्णय नाही,या निर्णयामुळे देशातील वंचित आशा 40 करोड समाजाला सामाजिक न्याय मिळणार आहे, त्यामुळे येथे विरोध करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

**पत्रकार:- आपल्या 20 वर्षाच्या मागणीला खऱ्या अर्थाने आता बळ मिळाले, असे म्हणता येईल , या बाबतीत सविस्तर सांगा..**

**मा.हरिभाऊ राठोड :-** केंद्र सरकारांनी जो केंद्रीय ओबीसी आरक्षणाचा विभाजन करण्याचा निर्णय घेतला आहे, या मुळे माझा 20 वर्षाची जी लढाई होती ती पूर्ण होतांना दिसत आहे. ओबीसींना मिळत असलेल्या 27 % केंद्रीय आरक्षणाचे विभाजन करून भटके विमुक्त आणि अतिमागासांना वेगळा कोटा देण्यात यावा या संदर्भात आम्ही जंग-जंग पछाडून गेली 20 वर्ष या संदर्भात शेकडो मोर्चे आंदोलन आणि लोकसभा आणि रस्त्याची लढाई लढली. गोपीनाथजी मुंडे ,प्रमोदजी महाजन ,तर अटलजी पर्यंत सर्वांनीच या कामाला गती दिली होती , श्रीमती सोनियाजी गांधी यांनी सुद्धा National Advisory Council मध्ये या संदर्भात खूप मेहनत घेऊन ,केंद्र सरकारला प्रस्ताव सादर केला होता.तसेच 2011 मध्ये कायदा मंजूर करून सर्व जातींची,आर्थिक व सामाजिक पाहणी करण्यासाठी सरकारला कायदा करण्यास भाग पाडले होते.

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे जस्टीस. व्ही. ईश्वरय्या यांनी सुद्धा मार्च 2015 मध्ये एक अहवाल देऊन ओबीसी चे तीन भागात विभाजन करा असा अहवाल केंद्र सरकारला सादर केला होता.

हा सर्व इतिहास haribhaurathod.org या संकेतस्थळा उपलब्ध आहे. तसेच वेळोवेळी ही माहिती मी माझ्या फेसबुक, युटब, व्हाट्स उप, वर उपलब्ध करून दिली आहे.

शेवटी, मोदी सरकारनी घेतलेला त्यांच्या कारकीर्दीतील सर्वात मोठा निर्णय ठरेल . आणि हा निर्णय इतिहासातील आणि सामाजिक न्याय देण्याचा दृष्टीने महत्वाचा ठरेल...